<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

**प्रेस नोट दि.०८/०५/२०१९**

**<u>दि.</u> ०८/०५/२०१९ <u>रोजी दु.१२/०० वा.ते २२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ४५१/१८,भादविक ३०२,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | सौ.राजकुमारी तिलाखे, वय ४० वर्षे, रा.पाषाण, पुणे |
| **आरोपी** | दिंगबर ऊर्फ बंटी लक्ष्मण ओव्हाळ, वय ४५ वर्षे,रा.घर नं.४७६,संजय गांधी वसाहत, फायर ब्रिगेडच्या पाठीमागे, पाषाण, पुणे(अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०५/२०१९ रोजी दुपारी १३/०० ते १३/३० वा.चे दरम्यान घर नं. ४७६, संजय गांधी वसाहत, फायर ब्रिगेडच्या पाठीमागे, पाषाण, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम दिगंबर ऊर्फ बंटी ओव्हाळ, हा फिर्यादीची बहिण हिस दारू पिऊन येवून नेहमी शिवीगाळी करून मारहाण करायचा. त्यावेळी फिर्यादी यांची आई त्यास "तु दारू पिऊन माझ्या घरात यायचे नाही, तु तुझ्या घरी जा" असे नेहमी म्हणायची. याचा राग मनात धरून वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमाने फिर्यादीची आई श्रीमती सुदामती देवराम गायकवाड, वय ७० वर्षे रा.घर नं. ४७६, संजय गांधी वसाहत, फायर ब्रिगेडच्या पाठीमागे, पाषाण,पुणे हिच्या डोक्यात, कपाळावर व तोंडावर लोखंडी गजाने मारून गंभीर जखमी करून,तिला जिवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. तुकाराम फड ९८२३०५७१४१ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २४६/१८,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ८० वर्षे,रा.रा.शंकरशेठ रोड, पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०५/२०१९ रोजी सकाळी ०७/३० वा.चे सुमारास स्वाती बेकरी मोदी मेन्शन शंकरशेठ रोड, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हया मोकळया जागेत झाडुन मारत असताना, मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी पैकी एकाने चॉकलेट घेण्याचा बहाणा करुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन जबरदस्तीने चोरण्याचा प्रयत्न करुन, त्या झटापटीत फिर्यादी खाली पडल्याने त्यांचे उजव्या हाताचे मधल्या बोटाला फ्रॅक्चर झाले त्याच दरम्यान नमुद इसमाने फिर्यादी यांचे गळयातील दो□यामध्ये गुंफलेले लक्ष्मीची मोहर असलेले सोन्याचे पॅन्डल जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.सी.उसगावकर ७३५०५४७००७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**